# फळसेवाडी हितकारी संस्था

## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 15 डिसेंबर 2002
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 12. श्री भरत गणपत राणे |
| 2. श्री उदय भगवान राणे | 13. श्री मधुसुदन श्रीधर राणे |
| 3. श्री सुरेश गंगाराम राणे | 14. श्री लवू शिवाजी राणे |
| 4. श्री रत्नकांत बालशिवाजी राणे (बाळा राणे) | 15. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 5. श्री मंगेश मनोहर राणे | 16. श्री आनंद नारायण साटम |
| 6. श्री हेमंतकुमार रमेश राणे | |
| 7. श्री मनोहर भिकाजी राणे | |
| 8. श्री श्रीकांत प्रभाकर राणे | **कोकण विकास प्रतिष्ठान** |
| 9. श्री सुनिल विनायक राणे | 1. श्री अशोक वाघ |
| 10. श्री मधुकर संभाजी राणे | 2. श्री रविन्द्र खेडेकर |
| 11. श्री एकनाथ अनंत राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्था 'विशेष सर्वसाधारण सभा' रविवार दिनांक 15 डिसेंबर 2002 रोजी शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012 या ठिकाणी संपन्न झाली. या सभेस 16 सभासद बंधू उपस्थित होते.

या सभेस सभेचे अध्यक्ष (हंगामी) श्री रामकृष्ण भगवान राणे अनुपस्थित असल्यामुळे या ठिकाणी प्रथम सभेच्या अध्यक्षांच्या स्थानी श्री मनोहर भिकाजी राणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. श्री मनोहर भिकाजी राणे यांनी अध्यक्षपद स्विकारल्यानंतर त्यांनी उपस्थितांचे आभार मानून सभेच्या कामकाजास सुरवात केली.

प्रथम दिवंगत कै अनुसया रावजी म्हसकर निधनाबद्दल दुःख: व्यक्त करून दोन मिनीटे स्तब्ध राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

यानंतर अध्यक्षांनी कार्यक्रमपत्रीकेप्रमाणे असलेल्या संस्थेच्या वाटचालीबद्दल विचार करणे (संस्था बंद अथवा चालू ठेवणे) या विषयावर चर्चा करण्यास सभाग्रहास अनुमती दिली.

या चर्चेस सुरवात करण्यापूर्वी त्यांनी वैयक्तीक संस्था चालू राहावी असे स्पष्ट मत मांडले. तसेच त्यांनी वर्गणीबद्दल विचारणा केली. आपल्या संस्थेची कोणत्या वर्षापर्यंत सभासदांची वर्गणी आली आहे अशी विचारणा केली. या विषयांस अनुसरून खजिनदार श्री उदय भगवान राणे यांनी सन 1998 पर्यंत वर्गणी वसुल झालेली आहे असे सांगितले.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(29 to 32)

अध्यक्षांनी संस्था चालू ठेवावी की बंद करावी का ? सभासदांनी पुन्हा आपली मते मांडावी असे सुचविले. या प्रश्नावर उपस्थित सभासदांनी प्रश्न मांडून चर्चेत भाग घेतला.

या चर्चेत श्री रत्नकांन्त बालशिवाजी राणे (2) श्री अशोक दत्ताराम राणे (3) श्री मंगेश मनोहर राणे (4) श्री भरत गणपत राणे (5) श्री मधुसुदन श्रीधर राणे यांनी भाग घेतला.

आपली संस्था सन 1937 पासून चालू आहे तसेच या संस्थेने या काळात शाळा चालू करून ज्ञानदानाचे कार्य केले तसेच विविध सामाजिक प्रश्न काळाच्या ओघात सोडविले, अशी संस्था बंद करणे अनिष्ठ  ठरेल. वेळ पडल्यास वर्गणी थकबाकीदारांकडून दंडात्मक कारवाई करावी अशी सूचना मांडली.

या मुद्याला अनुसरुन चिटणीसांनी सभासद अनुपस्थित राहत असल्यामुळे वर्गणी येत नाही असे सांगितले.

यांस अनुसरून अध्यक्षांनी लवकरात-लवकर सभेची तारीख ठरविण्याची सूचना केली सर्वानुमते 12 जानेवारी 2003 ही सभा घेण्यासाठी निश्चित करण्यात आली.

या वेळी श्री मधुसुदन श्रीधर राणे यांनी आपल्या पिसेकामते विकास मंडळाची मिटींग 05 जानेवारी 2003 रोजी शिरोडकर हायस्कूल येथे असून विशेषत: विठलादेवी मंदिरासंबधी विषय असून सर्वांनी उपस्थित राहून मंदिरास भरघोस मदत करावी हि विनंती केली.

याच दरम्याण कोकण विकास परिषदेच्या कार्यकत्यांनीदेखील आपली ओळख करून देऊन कॅलेन्डर विकत घेण्याची विनंती केली यांस सभासदांनी चांगला प्रतिसाद दिला.

सर्व चर्चा अत्यंत खेळामेळीने पार पडली व सर्व सभासदांनी चर्चेत भाग घेऊन दाद दिल्याबद्दल अध्यक्षांनी सर्वांचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहीर केले.

या प्रसंगी चहापाण्याचा खर्च श्री मंगेश मनोहर राणे यांनी केला त्याबद्दल संस्था त्याचे आभारी आहे. चिटणीसांनी त्यांचे आभार मानले.

---